सन २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी समुपदेशन केंद्र या योजनेसाठी निधी वितरित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक-समुप-२०१९/प्र.क्र.६६/का-१०

नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख- २० जुलै, २०१९

वाचा :-

शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.८ जुलै, २०१९.

प्रस्तावना :-

वित्त विभागाच्या संदर्भाधीन परिपत्रकानुसार वित्तीय वर्ष २०१९-२० च्या अर्थसंकल्पीय तरतूदींची मासिक निधी विवरणपत्रे अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) प्रशासकीय विभागांकडून नोंदविण्यात आल्यानंतर सन २०१९-२० च्या प्रथम नऊमाहीकरीता (डिसेंबर, २०१९ अखेर) आवश्यक असणारा अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत खर्चाचा अर्थसंकल्पीत निधी एकूण वार्षिक तरतूदीच्या ६० टक्केच्या मर्यादेत अर्थसंकल्पीय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) वितरीत केला जाईल, असे कळविले आहे.

२. सन २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी २२३५-३१७७ या लेखाशिर्षाखाली ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) बाबीसाठी ₹१०,००,००,०००/- (अक्षरी रुपये दहा कोटी फक्त) इतकी तरतूद मंजूर आहे. २२३५-३१७७ या लेखाशिर्षाखालील वित्त विभागाच्या संदर्भाधीन परिपत्रकानुसार वेतनेत्तर बाबींसाठी उपलब्ध निधीपैकी उप आयुक्त (महिला विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांनी मागणी केल्याप्रमाणे ₹३,८१,२२,४४४/- (अक्षरी रुपये तीन कोटी एक्याऐंशी लक्ष बावीस हजार चारशे चव्वेचाळीस फक्त) इतका निधी समुपदेशन केंद्र योजनेसाठी वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

वित्त विभागाच्या संदर्भाधीन परिपत्रकानुसार सन २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी समुपदेशन केंद्र योजनेसाठी अर्थसंकल्पीत निधी ₹१०,००,००,०००/- (अक्षरी रुपये दहा कोटी फक्त) पैकी उप आयुक्त (महिला विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांनी मागणी केल्याप्रमाणे समुपदेशन केंद्रातील कार्यरत समन्वयक व समुपदेशक यांचे मानधन तसेच समुपदेशन केंद्राच्या प्रशाकीय खर्च व प्रशिक्षण यावरील माहे एप्रिल, २०१९ ते मार्च, २०२० पर्यंतचा खर्च भागविण्यासाठी **₹३,८१,२२,४४४/- (अक्षरी रुपये तीन कोटी एक्याऐंशी लक्ष बावीस हजार चारशे चव्वेचाळीस फक्त)** इतका निधी वितरीत करण्यास याव्दारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. ₹३,८१,२२,४४४/- (अक्षरी रुपये तीन कोटी एक्याऐंशी लक्ष बावीस हजार चारशे चव्वेचाळीस फक्त) इतका निधी संबंधितांना अदा करण्यासाठी आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांनी वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि.८ जुलै, २०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार सदर परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील नमूद तपासणी सूचीतील अटींची पुर्तता होत असल्याची खात्री करुन जिल्ह्यांना निधी वितरीत करावा. सदर शासन निर्णयान्वये तसेच यापूर्वी वितरित करण्यात आलेल्या उर्वरीत निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करण्याची दक्षता आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांनी घ्यावी.

३. सदर रक्कम मागणी क्र.एक्स-१, कार्यक्रम, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२ समाजकल्याण १०३, महिला कल्याण (२१) (०१) महिलांकरिता समुपदेशन केंद्रे (कार्यक्रम), (२२३५ ३१७७), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तरतूदीतून खर्च करण्यात यावी.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.८ जुलै, २०१९ रोजीच्या परिपत्रकातील परिच्छेद क्र.४ ते १९ मधील मार्गदर्शक सूचना व त्या विभागाने दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०७२०१६५५१३७०३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAVINDRA SITARAM JARANDE

Digitally signed by RAVINDRA SITARAM JARANDE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=186d0f0fdd27c79b9b3f859a90ec537946c37d5876e64ce525d082e58e494c85, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBA,
serialNumber=4d2dc3dbd5c0f35a66a84c93b4cead367c64cc2bc9d7391e9a053988a2f81b64, ou=WOMEN AND CHILD DEVLOPMENT,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAVINDRA SITARAM JARANDE
Date: 2019.07.20 17:03:05 +05'30'

(र. सि. जरांडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
३. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
७. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर
८. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. कक्ष अधिकारी (का.४), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सदर तरतूद बी.डी.एस. प्रणालीवर उपलब्ध करुन देण्याच्या विनंतीसह अग्रेषित.
११. निवड नस्ती, का-१०.